जा.क्र. मसंके/टेटवली–प्रअ/ २४७ /२०२३
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,
ता. दापोली, जि. रत्नागिरी
दिनांक :– १६/०५/2023

प्रती,

**प्रभारी अधिकारी**
कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष,
डॉ. बासाकोकृवि, दापोली

**विषय :– विक्री योग्य आंबा कलमे ठेका पध्दतीने तयार करण्याची जाहीरात विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्दीस देणेबाबत......**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, टेटवली विभागास ठेका पध्दतीने विक्री योग्य आंबा कलमे ठेका पध्दतीने तयार करावयाची आहेत. तरी याबाबतची जाहीरात कृपया विद्यापीठाच्या www.dbskkv.org.in या संकेत स्थळावर प्रसिध्दीस देण्यात यावी ही विनंती.

सोबत :– प्रसिध्दी नमुना

आपला विश्वासू

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
ता.दापोली, जि. रत्नागिरी

जा.क्र.म.सं.के/टेटवली–प्रअ/ २७६/२०२३
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
टेटवली विभाग
दिनांक :– १६/०५/२०२३

## जाहीर नोटिस

मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली अंतर्गत टेटवली विभागामध्ये सन २०२३–२४ या आर्थिक वर्षात २५,००० नग विक्री योग्य आंबा कलमे तयार करण्याच्या उद्देशाने करावयाच्या कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | कामाचा तपशिल<br>कामाचा कालावधी माहे ०१ जुन २०२३ ते माहे ३० नोव्हेंबर २०२३ | बांधावयाची विक्री योग्य कलमे |
|---|---|---|
| १. | प्लॅस्टीक पिशव्या माती मिश्रणाने भरून पॉलीशेड मध्ये वाहतुक करून रांगेत लावणे. (५०००० नग) | २५००० |
| २. | प्रक्षेत्रावरील मातृवृक्षावरून आंबा अकुर काडया काढुन आणणे. (५०००० नग) | |
| ३. | आंबा रोपांवर कलमे बांधणे. (५०००० नग) | |
| ४. | वाफ्यावरून आंबा बाटा काढुन आणणे, स्वच्छ धुऊन निर्जंतुक करून कलमे बांधण्यास देणे व बांधलेली कलमे पिशव्यांमध्ये लावुन पाणी देणे, बांधलेल्या कलमांना आलेली फुट काढणे. (माहे जुन २०२३) | |
| ५. | शेड मधील बांधलेल्या कलमांना पाणी देणे, फुट काढणे, बेणणी करणे, फवारणी करणे, ड्रेंचींग करणे. (माहे जुलै व ऑगस्ट २०२३) | |
| ६. | शेड मधील बांधलेल्या कलमांना पाणी देणे, फुट काढणे, बेणणी करणे, फवारणी करणे, ड्रेंचींग करणे, कलमांच्या पट्टया सोडणे.(माहे सप्टेंबर ते नोव्हेंबर २०२३) | |

उपरोक्त विक्री योग्य कलमे बांधणीची कामे ठेका पध्दतीने करावयाची आहेत. कामाच्या अटी व शर्ती इत्यादी माहिती तसेच भरून दयावयाचे संमती पत्र आणि दरपत्रक नमुना या कार्यालयात कार्यालयीन कामाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. कंत्राटी कामांचे दरपत्रकामध्ये होणाऱ्या विक्री योग्य प्रति कलम दराचा स्पष्टपणे उल्लेख करावा. दरपत्रक या कार्यालयाने तयार कलेल्या नमुना पत्रामध्येच भरून द्यावयाचा आहे. आपले दरपत्रक आणि संमतीपत्र या कार्यालयात दिनांक :– २५/०५/२०२३ पर्यत किंवा त्यापुर्वी पोहोचेल असे पाठवावे. विहित दिनांकानंतर प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. लखोटयावर **''टेटवली विभाग अंतर्गत आंबा कलमे ठेका पध्दतीने बांधणे''** असा उल्लेख करावा, लिफाफा मोहोरबंद करून **मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली (टेटवली विभाग)** यांचे नावे पाठवावा. पोस्टाद्वारे होणाऱ्या विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही. दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा संपुर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील. दरपत्रकाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे जोडण्यात येत असुन त्या ठेकेदारास बंधनकारक असतील. सदर अटी व शर्ती मान्य असल्यास दरपत्रक सादरीकरणाचे वेळी मान्यतेबाबत स्वाक्षरी करून दरपत्रकासोबत जोडण्यात याव्यात.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
ता. दापोली, जि. रत्नागिरी